**फौ. कि. न्या.नं. ५८०/२०१९**

**CNR No. MHST07–0003851–2019**

**सौ. करिष्मा काझी वि. श्री.तौफिक काझी**

## निशाणी क्र ५ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३(१)व(२) अंतर्गत दरम्यानची पोटगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

### अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात असे की :–

२. अर्जदाराने असे कथन केले की, तिचे व सा.वाला नं. १ यांचा विवाह मुस्लीम धर्मशास्त्राप्रमाणे दि. २३/०६/२०१९ रोजी झालेला आहे. सदरचे लग्न अर्जदार हिचे आई वडिलांनी सुवर्ण अलंकार घालून संसारोपयोगी साहित्य देवून मोठया थाटात करुन दिलेला आहे. विवाहानंतर अर्जदार ही सा.वाला यांचे घरी सुकिवली ता.खेड जि.रत्नागिरी येथे नांदावयास गेली. सा.वाला नं. २ हा सासरा, सा.वाली नं. ३ सासू, सा.वाला नं. ४ व ५ दिर, तसेच सा.वाली नं. ६ व ७ या जाउ आहेत. सा.वाला यांनी अर्जदार हिला केवळ २ ते ३ आठवडेच व्यवस्थीत नांदविले. त्यानंतर दि. २६/०६/२०१९ रोजीचे स्वागत समारंभापासूनच अर्जदारास मानसिक व शारिरीक त्रास देणेस सुरवात केली. सा.वाला नं. १ ते ७ यांनी अर्जदारास साखरपुडयाच्यावेळी मानपान केला नाही, तुला स्वयंपाक येत नाही, गरोदरपणात माहेरहून औषोधोपचारासाठी पैसे घेवून ये, पोटातील बाळ आमचे नाही, घटस्फोट घे असे म्हणत तिचा शाररिक व मानसिक छळ केला. पुढे सा.वाला नं. १ ते ७ यांनी दि. १९/०८/२०१९ रोजी अर्जदार हिला कट करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन तिला माहेरी तांबवे येथे आणून सोडले. तसेच तु तुझ्या माहेरकडून सोन्याची चेन, ब्रेसलेट, घर खर्चासाठी दोन लाख रुपये घेवून ये असे म्हणून घडले प्रकाराबाबत पोलीस स्टेशनला अगर कोणाला सांगितलेस जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सा.वाला यांनी हाकलुन दिलेपासून सा.वाला यांनी आजअखेर अर्जदार हिचे उदरनिर्वाहाचे, औषधपाण्याचे, गरोदरपणातील उपचाराची कसलीही विचारपूस केली नाही. अर्जदार हिचे आई वडिलांनी मोलमजूरी करुन गरोदरपणातील औषधाकरिता २० हजार रुपये खर्च केले आहेत. अर्जदार ही

एकाकी होवून अर्धपोटी उपाशी राहून माहेरची परिस्थीती हालाखीची असतांनाही कसेतरी जीवन जगत आहे. त्यामुळे अर्जदाराला उदरनिर्वाह व औषध पाण्याकरिता दरमहा र.रु. २०,०००/– पोटगी मिळणेची विनंती केली आहे. तसेच सदर अर्जाचा निकाल होणेस बराच कालावधी जाणार असून अर्जदाराला उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे सा.वाला कडून अर्जदार हिला दरमहा पोटगी म्हणून र.रु. १०,०००/– देणेची विनंती केली आहे. अर्जदार हिने लग्नानंतर सा.वाला यांचे घरी नेलेले साहित्य व सुवर्ण अलंकर घेणेचे आहे अशी विचारणा केली असता सा.वाला यांनी अर्जदार हिला घरात घेतले नाही उलट तुझा आमचा काहीही संबंध नाही असे म्हणून शिवीगाळ करुन घरातून बाहेर काढले. सा.वाला नं. १ हा कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय करत असून त्याला सुमारे २० ते २५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सा.वाला याची गावी ३ ते ४ एकर शेती असून त्यामधून त्याला वार्षिक उत्पन्न ३ ते ४ लाख मिळते. सा.वाला नं. २ हा नोकरीस असून त्यास दरमहा र.रु. २० ते २५ हजार रुपये मिळतात. सा.वाला नं. ३ हा खाउच्या पानाचा व्यवसायिक असून त्यापासून त्यास ३ ते ४ लाख रुपये मिळतात. तसेच सा.वाला नं. ४ हा कॉन्ट्रॅक्टर असून त्यास २० ते ३० लाख रुपये मिळतात. सा.वला यांचे नावावर घर मिळकत, बंगला, प्लॉट व शेतजमिन आहे. तसेच सा.वाला नं. १ याचे उत्पन्नावर कोणीही अवलंबून नाही. सबब अर्जदार हिस दरमहा १०,०००/– अंतरिम पोटगी देणेचा हुकूम होणेची विनंती केली.

४. सदर अर्जाचे कामी सा.वाला यांनी हजर होवून त्यांनी नि.१३ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले व अर्जदाराची अर्जातील कथने अमान्य केली आहेत.

५. सा.वाला यांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार व सा.वाला यांचे विवाहाचा संपूर्ण खर्च निम्मा निम्मा केलेला होता. लग्नानंतर अर्जदार ही सा.वाला यांचे मुळ गांव वाळवा येथे नंतर खेड येथे नांदणेस आली. परंतू अर्जदार ही उत्साह नसल्यासारखे वागत असे तसेच ती रागीट, भांडखोर स्वभावाची असून सदरचे लग्न तिच्या घरच्याच्या जबदरस्तीने झाल्याचे सा.वाला क्र. १ ला सांगत असे. तसेच ती सामनेवाला यांना कोणतीही शाररिक व संसारिक सुख देत नसे. अर्जदार ही सतत तलाकची मागणी करीत असे, पुढे सदरचा प्रकार सा.वाला क्र. १ ने अर्जदाराच्या चुलत्याला सांगितला असता त्यांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला परंतू दि. १६/०८/२०१९ रोजी अर्जदार ही घरातील कोणालाही न सांगता घरातील सोडचार

तोळे सोने घेवून स्वतःहून माहेरी निघून गेली. त्यानंतर सा.वाला नं. १ यांनी अर्जदाराला फोन करण्याचा प्रयत्न केला तरी देखील अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे दि. ०८/०९/२०१९ रोजी नाईलाजास्तव सा.वाला नं. १ व घरातील लोक अर्जदार हिचे गावी आले. त्याठिकाणी अर्जदाराच्या वागणुकीबाबत व त्रासाबाबत चर्चा झाली. त्यावेळी अर्जदार हिने सा.वाला नं. १ याची अश्लील शिवीगाळ करुन अपमान केला, त्यावेळी अर्जदार हिचे भाउ व वडिल हे सा.वाला नं. १ यांचे अंगावर धावून आले. त्यावेळी अर्जदार ही मला तुमच्यासोबत रहायचे नाही, मला तलाक द्या, मला तुम्ही पसंत नाही, असे सांगितले. त्यावेळी तेथे उपस्थित असणारे गावातील लोकांनी सा.वाला नं. १ व घरातील लोकांना आठ दिवसांची मुदत द्या असे सांगितले. त्यानंतर सा.वाला नं. १ यांनी वाट पाहून अर्जदाराशी व घरातील लोकांशी संर्पक साध्याचा प्रयत्न केला परंतू कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर दि. १७/०९/२०१९ व दि. १८/०९/०१९ रोजी सा.वाला नं. १ व घरातील लोक पुन्हा अर्जदार हिचे तांबवे गावी आले. त्यावेळी देखील अर्जदाराच्या घरच्या लोकांनी आम्ही आमच्या मुलीला तुमच्याकडे नांदावयास पाठविणार नाही, आम्ही तिला सांभाळणेस समर्थ आहोत असे सांगितले व घरातून हाकलून दिले. त्यानंतर सा.वाला यांनी दि. २१/०९/२०१९ रोजी अर्जदार यांना तलाक बाबत नोटीस पाठविली. सदर नोटीस मिळून देखील अर्जदार हिने कोणतेही उत्तर दिले नाही व नोटीसीमध्ये नमूद केले प्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही.

६. सा.वाला यांनी पुढे असे कथन केले की, मुस्लीम कायद्यातील नवीन तरतुदीप्रमाणे दि. १०/१०/२०१९, १०/११/२०१९ व १०/१२/२०१९ रोजी दोन मुस्लीम सज्ञान साक्षीदारांसमक्ष "करिश्मा, मैने तुझे तलाक दिया" असे प्रत्येक एक वेळेला स्वः मुखाने उच्चरुन तलाक दिलेला आहे व त्याबाबत दि. १०/१०/२०१९, १०/११/२०१९ व १०/१२/२०१९ रोजी नोटीस पाठविलेली आहे. सदर नोटीस मिळून देखील अर्जदार हिने कोणताही खुलासा दिलेला नाही. त्यानंतर सा.वाला यांनी अर्जदार हिला महेर ची र.रु. ५०००/– प्रमाणे तीन महिनेचे कालावधीसाठी एकूण र.रु. १५,०००/– रजि.मनीऑर्डर दि. ११/१२/२०१९ रोजी पाठविली असून सदर मनीऑर्डर दि. १८/१२/२०१९ रोजी "Refused" अशा शे–यानिशी सा.वाला यांना परत आलेली आहे. अशा प्रकारे दि. १०/१२/२०१९ पासून अर्जदार व सा.वाला नं.

१ यांचे वैवाहिक हक्क, विवाह कायमपणे व अंतीमपणे संपुष्टात आलेला आहे. मुळात अर्जदार ही सा.वाला नं. १ ची पत्नीच राहिली नसल्याने तिच्या पालन पोषणाची कोणतीही जबाबदार सा.वाला नं. १ याचेवर नाही. तसेच अर्जदार कथन करते त्याप्रमाणे सा.वाला नं. १ यांना उत्पन्न मिळत नाही. उलट सा.वाला यांचे नावावर अगर त्यांचे मालकीची शेत जमिन नाही. त्यामुळे सा.वाला नं. १ याची अर्जदार यांना उचलून पोटगी देण्याची ऐपत नाही. सबब अर्जदाराचा अर्ज फेटाळणेची विनंती केली.

७. अर्जदार व सा.वाला यांचे कथने विचारात अर्जाच्या निर्णयासाठी खालील वादप्रश्न उपस्थित झाले. त्यासंबंधीचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारग्रस्त व्यक्ती आहे असे प्रथमदर्शनी दिसते काय ? | होय. |
| २ | सा.वाला क्र. १ ने उत्पन्नाचे साधन असून देखील अर्जदार हिचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे काय ? | होय. |
| ३ | अर्जदार ही सा.वालाकडून दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ?जर होय, तर दरमहा किती पोटगी ? | होय, अर्जदार करिता र.रु. ४०००/–दरमहा पोटगी. |
| ४ | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>वादप्रश्न क्र. १ करिता :–</u>

८. अर्जदार हिचेवर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे किंवा नाही हे पाहणेकरिता महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ मध्ये दिलेल्या कौटूंबिक हिंसाचारीची व्याख्या पाहणे उचित ठरते. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ च्या कलम ३ मध्ये घरगुती हिंसाचाराबाबत सांगितले आहे.

त्यानुसार महिलेला मानसिक व शाररिकदृष्टया इजा पोहचविणे, तिला अथवा तिच्या माहेरच्या लोकांना टाकून बोलणे, अवमानीत करणे, त्यांना हुंडयाची मागणी करणे, पिडीत महिलेचा भावनिक छळ करणे, तिला आर्थिक सहाय्य न करणे, तिला घरगुती अधिकारापासून वंचित ठेवणे इत्यांदी घटकांचा घरगुती हिंसाचारामध्ये समावेश होतो. सदर प्रकरणात अर्जदाराचा पिडीत महिला म्हणून झालेल्या छळाचा उपरोक्त नमूद घरगुती हिंसाचाराच्या व्याखेत समावेश होतो किंवा नाही हे बघणे गरजेचे आहे.

९. वरील कायद्याची तरतुदी लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदाराने सा.वाला नं. १ यांनी इतर सा.वाला यांच्या मदतीने तिचा शाररिक व मानसिक छळ केल्याचे कथन केले आहे. यापृष्ठयर्थ तिने प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र नि. १८ दाखल केले आहे. तसेच अर्जदार हिला सा.वाला यांनी दोन ते तीन आठवडे व्यवस्थित नांदविल्याचे कथन केले आहे. याउलट सा.वाला यांनी दि. ०६/०८/२०१९ रोजी अर्जदार ही माहेरी निघून गेल्याचे कथन केले आहे. अर्जदार व सा.वाला यांनी दाखल केलेल्या उत्पन्नाच्या शपथपत्रामध्ये विभक्त होण्याची तारीख अनुक्रमे दि. १७/०८/२०१९, १६/०८/२०१९ अशी सांगितली आहे. अशाप्रकारे दि. १६/०८/२०१९ पासून आजतागायत अर्जदार ही सा.वाला पासून विभक्त असल्याचे उपभयपक्षांना मान्य असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत सा.वालाचे असे कथन आहे की त्याने अर्जदाराला तलाक दिला असून त्यापृष्ठयर्थ त्याने अर्जदाराला इद्दत रक्कम रक्कम मनीऑर्डरने पाठविली आहे. परंतू सा.वाला याने अर्जदार हिला कायदेशीर पध्दतीने घटस्फोट दिला अथवा नाही हे पुराव्याअंती ठरणार आहे. अशा परिस्थीतीत सा.वाला याने आजतागायत अर्जदाराच्या पालन पोषणाची जबाबदारी उचलल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची सा.वाला याची कृती प्रथमदर्शनी कौटूंबिक हिंसाचाराच्या व्याखेत मोडते. पुढे अर्जदारावर एका लहान मुलाच्या पालन पोषणाची जबाबदारी दिसून येते. त्या मुलाबाबत सा.वाला याचे असे कथन आहे की ते मुल त्यांचे नाही परंतू त्या पृष्ठयर्थ सा.वाला क्र. १ ने कोणताही प्रथम दर्शनी पुरावा अभिलेखावर आणला नाही. उलट अर्जदाराने त्या मुलाचे आधारकार्ड अभिलेखावर आणले आहे ज्यावरुन त्या मुलाचे वडिल सा.वाला क्र. १ असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशापरिस्थीतीत सा.वाला याने त्या मुलाची कोणतीही पालन पोषणाची तरतुद केल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थीतीत मला असे वाटते की अर्जदार ही

प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचारस बळी पडलेली असून ती हिंसाचारग्रस्त व्यक्ती आहे. सबब मी वादप्रश्न क्र. १ चे उत्तर होय असे देते.

**वादप्रश्न क्र. २ व ३ करिता :–**

१०. वादप्रश्न क्र. २ च्या अनुषंगाने अर्जदार हिने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की सा.वाला यास उत्पन्नाचे साधन असून देखील तिचा सांभाळ व पालनपोषण करण्याची कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. यापृष्ठयर्थ दोन्ही पक्षांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशनानुसार उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार हिच्या उत्पन्नाचा शपथपत्रावरुन असे दिसून येते की, ती आजतागायत माहेरी राहत असून तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच तिच्यावर दिड वर्षाच्या मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी दिसून येते. याउलट सा.वाला याने दाखल केलेल्या शपथपत्रावरुन त्याला दरमहा १५,०००/– एवढे उत्पन्न असल्याचे दिसून येते. तसेच सा.वाला याचे शपथपत्रावरुन असे दिसून येते की त्याच्यावर कुटूंबातील आई वडिल सोडून इतर कोणत्याही व्यक्तीच्या पालनपोषणाची जबाबदारी नाही. पुढे त्याने ३ लाख रुपये लॉकडॉउनच्या काळात पाहूण्यांकडून घेतल्याचे कथन केले असून त्यापैकी ५५,०००/– आजतागायत परत दिल्याचे सांगितले आहे. परंतू यापृष्ठर्थ त्याने सदर बाबीस दुजोरा देणारे इतर कोणत्याही व्यक्तीचे शपथपत्र दाखल केल्याचे दिसून येत नाही. सा.वाला याने त्याच्या शपथपत्रात अर्जदार हिला १८,०००/– रुपये उत्पन्नाचे साधन असल्याचे कथन केले आहे. परंतू त्यापृष्ठर्थ त्याने कोणताही कागदोपत्री पुरावा प्रथमदर्शनी न्यायालयासमोर आणलेला नाही. सबब मला असे वाटते की सा.वाला क्र. १ यास उत्पन्नाचे साधन असूनही अर्जदाराचा सांभाळ करण्यास नकार दिलेला आहे त्यामुळे सा.वाला हा अर्जदारास पोटगी देण्यास पात्र आहे.

११. एखाद्या अर्जामध्ये पोटगीची रक्कम ठरवित असतांना दोन गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये सर्वप्रथम अर्जदाराची परिस्थीती व दुसरी गोष्ट म्हणजे सा.वाला क्र. १ याची ऐपत. या दोन्हीच्या दृष्टीने अभिलेखावर उपलब्ध असलेल्या कागदोपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.वाला यास दरमहा १५,०००/– रुपये एवढे उत्पन्न असून त्याच्यावर आई वडिल सोडून कुटूंबाच्या इतर कोणत्याही व्यक्तीची पालनपोषणाची जबाबदारी दिसून येत नाही. याउलट अर्जदार हिला

उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून तिच्यावर दिड वर्षाच्या मुलाची पालनपोषणाची जबाबदारी असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत मला असे वाटते की सा.वाला क्र. १ याला उत्पन्नाचे साधन उपलब्ध असून त्याने अर्जदार हिचा सांभाळ करण्यास असमर्थता दर्शविलेले आहे. त्यामुळे सा.वाला क्र. १ याचे उत्पन्नाचे स्तोत्र, तसेच अर्जदार व सा.वालाचे वय, सध्याची महागाई, जीवनमान यांचा सारासार विचार करता अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये ४०००/– दरमहा दरम्यानची पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून देणे योग्य व न्यायोचीत वाटते.

**वादप्रश्न क्र. ४ करिता :–**

१२. उपरोक्त वादप्रश्न दिलेल्या निर्णयानुसार अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अंतर्गत तरतुदीनुसार सा.वाला क्र. १ याचेकडून दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. यासर्व विवेचनावरुन या वादप्रश्नाचे उत्तर देताना मी खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सा.वाला क्र. १ याने मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यत अर्जदार हिस दरम्यानची पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ४०००/– एवढी पोटगी अर्ज दाखल तारखेपासून देणेची आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा मुळ अर्जाच्यासोबत ग्राहय देण्यात येईल.

४. महिलांचे कौंटुबिक हिंसाचारापसून संरक्षण कायदा २००५ चे कलम २४ नुसार या आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत देणेत यावी.

स्थळ : कराड ( डॉ.पी.डी.देशपांडे )
दिनांक : २२/११/२०२१ ४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड.